# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## **ग प्रभाग कार्यालय**
## कार्यपत्रिका क्रमांक - ९
## सभावृत्तांत

दिनांक - ५/३/२०१८ वेळ - **सकाळी** ११:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दि.०५/०३/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.श्री.अभिषेक गोविंद बारणे – सभापती**
२. मा.कदम निकीता अर्जुन
३. मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे
४. मा.पवार मनिषा प्रमोद
५. मा.बारणे अर्चना तानाजी
६. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
७. मा.ऍड.भोसले सचिन सुरेश
८. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९. मा.निलेश हिरामण बारणे
१०. मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन
११. मा.सविता बाळकृष्ण खुळे
१२. मा.सुनिता हेमंत तापकीर
१३. मा.चंद्रकांत बारकु नखाते

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्रीमती स्मिता झगडे – क्षेत्रिय अधिकारी, श्री.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, श्री.एस.एस.कुलकर्णी – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.ओंभासे पी एस – कार्यकारी अभियंता(स्थापत्य)श्री.तांबे – कार्यकारी अभियंता(पाणीपुरवठा)श्री.संदेश चव्हाण – कार्यकारी अभियंता (विद्युत) श्री.मोमीन ए. ए – कनिष्ठ अभियंता, श्री.बोनगीर ए. एम – लेखाकारी, श्री.दिलीप धुमाळ – उप अभियंता,विद्युत, श्री.नितीन निंबाळकर , श्री ओहोळ व्ही.बी. - उपअभियंता स्थापत्य, श्री.साबळे बी आर-उपअभियंता, श्री.मोहिते एस एस – उपअभियंता जलनि:सारण, श्री.कलाल इ.के,श्री.कोरेवार एम बी, श्री.गजपुरे व्ही पी, श्रीम.सानप ए.व्ही, श्रीम.घोडके पी पी – कनिष्ठ अभियंता स्थापत्य,श्री.सतिष

तायडे – विद्युत, श्री.बंडगर एस बी – जलनि:सारण, श्री.संदिप मो.पाडवी – कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा, श्री.मगर एस एम – कनिष्ठ अभियंता, श्रीम.अश्विनी चौधरी – सहा.शिक्षक इ. कर्मचारी उपस्थित होते.

-----

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

दि.५/२/२०१८ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र. ७ )व दिनांक १४/२/२०१८ चे विशेष सभेचा सभावृत्तांत( कार्यक्रम पत्रिका क्र.८ ) कायम करणेत आला.

-------

ठराव क्रमांक - विषय क्रमांक- १

दिनांक- ५/०३/२०१८

सूचक- मा. अनुमोदक – मा.

**संदर्भ –** मा.निकिता कदम यांचे दिनांक १/०१/२०१८ चे पत्र..

मा.उषा वाघेरे यांनी दिनांक ३/०२/२०१८ रोजी दिलेल्या पत्रानुसार पिंपरी वाघेरे येथील जलतरण तलावास " श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज " असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदरचा विषय तहकुब करण्यात येत असुन पुढील सभेचे वेळी सदर विषय घेणेत यावा

------

ठराव क्रमांक - ३९ विषय क्रमांक- २

दिनांक- ५/०३/२०१८

सूचक- मा.सविता खुळे अनुमोदक – मा.बाबासाहेब त्रिभुवन

**संदर्भ –** मा.चंद्रकांत नखाते यांचे दिनांक २३/०२/२०१८ चे पत्र..

मा.चंद्रकांत नखाते यांनी दिनांक १३/२/२०१८ रोजी दिलेल्या पत्रानुसार गाव मौजे रहाटणी येथील प्राथमिक शाळा क्र.५५ येथील श्री.छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयासमोरील चौकास अद्याप काही नाव देण्यात आलेले नाही. सदर चौकाचा परिसर हा रहाटणी भागातील सर्व नागरिकांना ठाऊक आहे, परंतु एखाद्या नवीन व्यक्तिस पत्ता सांगावयाचा झाल्यास नागरिकांना तो भाग लवकर लक्षात येत नाही. याकरीता सदर शाळेलगत श्री छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा असल्याने नागरिकांच्या इच्छेनुसार सदर चौकास श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक असे नामांकन करण्यात यावे, सदर विषय कायम होण्याची वाट न पाहता ठरावानुसार कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

**सभा कामकाजात ऐनवेळी दाखल करुन घेणेत आलेले विषय खालीलप्रमाणे**

ठराव क्रमांक - ४०　　　　　　　　　　　　विषय क्रमांक- ३

दिनांक- ५/०३/२०१८

सूचक- मा.अभिषेक बारणे　　　　　　　　　　अनुमोदक – मा.कैलास बारणे

**संदर्भ –** मा.अभिषेक बारणे यांचे दिनांक ५/०३/२०१८ चे पत्र..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र.२४ डांगे चौक, छत्रपती शिवाजी महाराज उड्डाणपुल व प्रभाग क्र.२३ व २७ मध्ये येणारा नानासाहेब धर्माधिकारी उड्डाणपुल या पुलांखाली पे ऍण्ड पार्किंगची सुविधा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

अध्यक्ष
ग प्रभाग समिती
थेरगाव– ३३.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/४/　　/२०१८
दिनांक -　　/०३/२०१८

प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
क्षेत्रीय कार्यालय,
थेरगाव – ३३

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या
ठरावानुसार कार्यवाही करणेत यावी.